# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक 13/09/2023 (बुधवार) सकाळ**

---

## खूनाचा प्रयत्न

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत १२ कि. मी अंतरावरील तेलकामठी फिर्यादीचे राहते घर ,ता. कळमेश्वर येथे दिनांक ११/०९/२०२३ चे १९.३० वा. ते २०.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– रविंद्र पांडुरंग घोरमारे, वय ४० वर्ष रा तेलकामठी ता. कळमेश्वर, जि नागपुर याचे गावात महाप्रसादाचा कार्यक्रम असल्याने त्यांची पत्नी व दोन मुले असे मिळून महाप्रसाद घेण्यासाठी जायचे असल्याने आई वडीलांना घरीच ठेवून घराचे दाराचे पडदे लावून बाहेर येत असता यातील फिर्यादीचे मोठे भाऊ आरोपी नामे– राजेंद्र पांडुरंग घोरमारे, वय ४२ वर्ष, रा. तेलकामठी ता. कळमेश्वर याने फिर्यादीला दाराला कुलुप लावून जा पडदा कशाला लावतो असे म्हणून आरोपी याने शिवीगाळ केली आरोपी याने फिर्यादीचे पत्नीकडे बघून शिवीगाळ केली. त्यास फिर्यादी याने हटकले असता आरोपी याने फियादीचे पत्नीस अश्लील शिवीगाळ करून घरातुन सत्तुर आणुन फिर्यादीचे पत्नीला कपाळावर उजव्या बाजुला, पाठीवर उजव्या बाजुला, पोटावर मध्यभागी व डावे हाताचे मनगटावर वार घालून जख्मी केले. व जिवानिशी ठार मारण्याचा प्रयत्न केला. तसेच मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३०७, २९४, ५०६ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पो.उप.नी. व्यंकटेश दोनोडे पो.स्टे. सावनेर मो. नं. ९१४६६२५५३२ करीत आहे.

## चोरी

१) पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत सुपर मार्केट रामटेक येथे दिनांक १०/०९/२०२३ चे १९.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– फिर्यादि नामे– अशोक नथ्थुजी नागपुरे, वय ६० वर्ष, रा. आदर्श कॉलनी शितलवाडी रामटेक यांचा मुलगा याने दोन वर्षापुर्वी रेडमी कंपनीचा नोट १० प्रो मॅक्स हा मोबाईल विकत घेतला होता. त्यात दोन ईएमआय असलेले त्यामध्ये एयरटेलचे सीम असुन बॅक ऑफ इंडिया खाता व युनीयन बॅक खाते असे असुन दोन्ही खाते फोन पे गुगल पे सोबत जोडलेले होते. दि.१०/०९/२०२३ रोजी अंदाजे सायंकाळी ०७/०० वा सुमारास रामटेक बाजारात भाजीपाला खरेदी करत असता फिर्यादिचा रेडमी कंपनीचा नोट १० प्रो मॅक्स हा कोणीतरी अज्ञात इसमाने चोरल्याने फिर्यादि यांनी एयरटेलचे सीम बंद केले. दिनांक ११/९/२०२३ सकाळी ०८/०० वा. सुमारास फिर्यादी यांना जिल्हा परिषद येथे काम असल्याने नागपुर येथे निघुन गेले नागपूर येथे असताना मुलगा आकाश याने फोन करून सांगीतले की तुमच्या फोन पे गुगल पे मधुन पैसे काढले आहे का कोणीतरी पैसे काढत आहे आता पर्यत ८७०००/– रू ची शॉपीग केली आहे. तुम्ही लवकरात लवकर बॅक मध्ये जावुन खाते बंद करा असे सांगीतल्या वरून फिर्यादि व त्याचा मुलगा याने पो.स्टे. रामटेकला येवुन रिपोर्ट दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादवी सहकलम माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६(बी) (ड) कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोनी यादव मो. नं. ९८२३९१८४८६ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर